# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- ०२ // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त // दि. ११/१०/२०१८**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. ११/१०/२०१८ गुरुवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर | सोनवणे धिरज मुरलीधर | सोनवणे सुरेखा सुदाम |
| जोहरे प्रिया मधुकर | काळे दिपमाला मनोज | ढेकळे सदाशिव गणपत |
| नेरकर सरिता अनंत | पाटील सचिन भिमराव | पाटील राजेंद्र झिपरु |
| पोकळे दिलीप बबनराव | भोईटे लताबाई रणजीत | महाजन सुनिल सुपडू |
| खान रुकसानाबी गबलु | पाटील चंद्रशेखर शिवाजी | महाजन जयश्री सुनिल |
| सोनवणे कांचन विकास | कापसे मयुर चंद्रकांत | शेख शबानाबी सादीक |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे प्रतिभा चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| शिंदे गायत्री उत्तम | देशमुख प्रतिभा गजानन | बालाणी भगतराम रावलमल |
| बाविस्कर किशोर रमेश | पाटील विजय पुडलिक | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सपकाळे मिना धुडकु | सोनवणे सुरेश माणिक | काळे रेश्मा कुंदन |
| कोळी दत्तात्रय देवराम | बारी शोभा दिनकर | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे रंजना भरत | शेख हसीनाबी शरीफ | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | पाटील कुलभुषण विरभान | सोनार रंजना विजय |
| सोनवणे भारती कैलास | भिल पार्वताबाई दामु | खडके सुनिल वामनराव |
| चौधरी चेतना किशोर | कोल्हे सिंधु विजय | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे ललीत विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| भंगाळे विष्णु रामदास | बेंडाळे उज्वला मोहन | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे राखी शामकांत | राणे गायत्री इंद्रजित | शेख सैईदा युसुफ |
| तायडे ज्योती शरद | तायडे सुरेखा नितीन | पटेल इब्राहिम मुसा |
| लढढा नितीन बालमुकुंद | चव्हाण ज्योती बाळासाहेब | सोनवणे लताबाई चंद्रकांत |
| काळे अमित पांडुरंग | मराठे जितेंद्र भगवान | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी मंगला संजय | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | पाटील रेखा चुडामण | |

सदर सभेस मा.आयुक्त, चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त, श्री. चंद्रकांत खोसे, मा.उपायुक्त, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुभाष मराठे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

नगरसचिव :- आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य, सनकत चेतन गणेश, चौधरी मनोज सुरेश, पाटील उषा संतोष, बरडे नितीन मनोहर यांचे रजेचे अर्ज आलेले आहेत ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

नगरसचिव :- प्रशासनातर्फे व मा.महापौर यांचे तर्फे सभेला उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांचे हार्दीक स्वागत.

मा.महापौर :- सर्व सदस्यांना विनंती आहे की सभाकाजात सर्वांनी सहकार्य करावे तसेच सभागृहातील कामकाज हे नियमानुसार करावे.

श्री.नितीन लढ्ढा :- मा.महापौर महोदया, सन २०१८ च्या मनपा निवडणुकीत आपण निवडुण आलात व प्रथम महिला महापौर म्हणुन आपण निवडले गेला आहात. सर्वात शक्तीशाली महापौर म्हणुन आपल्याकडे पाहीले जाईल. आपली ही या सभागृहात दुसरी टर्म आहे तसेच आता आपलीच सत्ता आहे, पालकमंत्री, मा.आमदार यांचे आपल्याला सहकार्य आहे.

आपल्या महापौर पदाचा दहा महिन्यांचा कार्यकाळ आहे त्यात आता एक महिना होवुन गेला असुन उर्वरीत नऊ महिन्यांच्या कालावधीत आपल्याला हुडको, गाळेप्रश्न, हॉकर्स इ. प्रश्न आहेत ते आपण योग्य तऱ्हेने सोडवाल ही अपेक्षा आहे. तसेच आपण सभाकाम करताना सभागृहाला विश्वासात घ्यावे ही विनंती.

मा.महापौर :- ठिक आहे, आपले ही आम्हांस सहकार्य मिळेल ही अपेक्षा आहे.

नगरसचिव :- श्री.भगत बालाणी यांची भा.ज.पा.गटनेतेपदी, श्री.अनंत जोशी यांची शिवसेना गटनेतेपदी तसेच श्री. बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम यांची एम.आय.एम. गटनेता म्हणुन निवड झालेली आहे या सर्वांचे हार्दीक अभिनंदन तसेच श्री.सुनिल महाजन यांची विरोधी पक्षनेता म्हणुन तर श्री.ललित कोल्हे यांची सभागृहनेता म्हणुन निवड झालेली आहे त्यांचे सुध्दा हार्दीक अभिनंदन.

अड.सौ.शुचिता हाडा :- मा.आयुक्त साहेब, मा.महापौर महोदया, सर्वप्रथम मी सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत करते. आपण वेगवेगळया पक्षाकडून या सभागृहात निवडून आलेलो आहोत. आपले सर्वांचे एकच उद्दिष्ट आहे ते म्हणजे जळगावचा सर्वांगीण विकास तरी याकामी सर्वांनी साथ दयावी व विरोधी पक्षाने याकरिता आपल्या ज्ञानाचा उपयोग करुन दयावा. तसेच या सभागृहात महिला सदस्यांची संख्या जास्त असल्याने सर्वांनी सभागृहातील कामकाज करताना आपली वर्तणुक चांगली ठेवावी व व्यवस्थित बोलावे तसेच सदस्यांनी सुध्दा अधिकाऱ्यांशी व्यवस्थित बोलेले पाहीजे. तसेच आपण आयुक्त साहेब यांचे कामाचा अनुभवाचा उपयोग करुन घ्यावा.

**नगरसचिव :- विषय क्रं.१)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(२) चे तरतुदीनुसार व कलम ३१ अ (१) व (२) चे तरतुदीनुसार स्थायी समितीवर मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळानुसार प्राप्त सोळा जागेसाठीचे नामनिर्देशन लक्षात घेऊन व त्याबाबत गटनेत्यांनी केलेल्या शिफारशीचा विचार करुन १६ स्थायी समिती सदस्यांचे नामनिर्देशनास मान्यता देणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम **१९४९** चे कलम **२०**(**२**) चे तरतुदीनुसार व कलम **३१** अ (**१**) व (**२**) चे तरतुदीनुसार दिनांक ०६/१०/२०१८ रोजी महानगरपालिकेतील सर्व पक्षांचे व आघाडीचे गटनेते यांचे समवेत विचार विनिमय करुन तसेच महासभेत या संबंधात चर्चा होऊन पक्षीय बलाबलानुसार भारतीय जनता पार्टीचे १२, शिवसेनेचे ३, ऑल इंडिया मजलीस-ए- इत्तेहादुल मुस्लीमीन १ असे सदस्य नामनिर्देशित करणे संबंधात सर्व संमतीने निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने त्या त्या पक्ष / आघाडीच्या गटनेत्यांनी मा.महापौर यांचेकडेस स्थायी समितीवर नियुक्त करावयाच्या सदस्यांची नांवे लिखीत स्वरुपात कळविली. स्थायी समितीच्या सोळा (१६) सदस्य पदासाठी सोळा उमेदवारांचीच नांवे आल्याने खालील सदस्याच्या स्थायी समितीच्या सदस्यपदी नियुक्तीस मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

| **अ.क्र.** | **नियुक्त स्थायी समिती सदस्यांचे नांव** |
|---|---|
| १. | बालाणी भगतराम रावलमल |
| २. | ढेकळे सदाशिव गणपत |
| ३. | अड.हाडा शुचिता अतुलसिंह |
| ४. | बेंडाळे उज्ज्वला मोहन |
| ५. | पोकळे दिलीप बबनराव |
| ६. | कोल्हे प्रविण रामदास |
| ७. | खडके सुनिल वामनराव |
| ८. | पाटील प्रतिभा सुधिर |
| ९. | सनकत चेतन गणेश |
| १०. | सोनवणे सुरेश माणिक |
| ११. | कापसे मयुर चंद्रकांत |
| १२. | मराठे जितेंद्र भगवान |
| १३. | लढढा नितीन बालमुकुंद |
| १४. | भंगाळे विष्णु रामदास |
| १५. | बरडे नितीन मनोहर |
| १६. | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६९** **प्रतिकुल मते :- ००**

**नगरसचिव :- विषय क्रं.२)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) चे तरतुदीनुसार व कलम ३१ अ (१) व (२) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समितीवर मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळानुसार प्राप्त नऊ जागेसाठीचे नामनिर्देशन लक्षात घेऊन व त्याबाबत गटनेत्यांनी केलेल्या शिफारशीचा विचार करुन ९ महिला व बालकल्याण समिती सदस्यांचे नामनिर्देशनास मान्यता देणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) चे तरतुदीनुसार व कलम ३१ अ (१) व (२) चे तरतुदीनुसार दिनांक ०६/१०/२०१८ रोजी महानगरपालिकेतील सर्व पक्षांचे व आघाडीचे गटनेते यांचे समवेत विचार विनिमय करुन करुन तसेच महासभेत या संबंधात चर्चा होऊन पक्षीय बलाबल लक्षात घेवून भारतीय जनता पार्टीचे ७, शिवसेना २ असे सदस्य नामनिर्देशित करणे संबंधात सर्व संमतीने निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने त्या त्या पक्ष / आघाडीच्या गटनेत्यांनी मा.महापौर यांचेकडेस महिला व बालकल्याण समितीवर समितीवर नियुक्त करावयाच्या सदस्यांची नांवे लिखीत स्वरुपात कळविली. महिला व बालकल्याण समितीच्या नऊ (९) सदस्य पदासाठी नऊ उमेदवारांचीच नांवे आल्याने खालील सदस्याच्या महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी नियुक्तीस मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | नियुक्त **महिला व बालकल्याण** समिती सदस्यांचे नांव |
|---|---|
| १. | काळे रेश्मा कुंदन |
| २. | नेरकर सरिता अनंत |
| ३. | बारी शोभा दिनकर |
| ४. | तायडे सुरेखा नितिन |
| ५. | पाटील उषा संतोष |
| ६. | चौधरी मंगला संजय |
| ७. | खान रुकसानाबी गबलु |
| ८. | ज्योती शरद तायडे |
| ९. | जयश्री सुनिल महाजन |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ६९** **प्रतिकुल मते :- ००**

सामुहीक राष्ट्रगीत गायनानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही /-**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका जळगांव**